CNRNOMHSNO60006722018

**नियमित दिवाणी मुकदमा नं. ७६/२०१८ मधील नि. ३८ खालील आदेश**
**(श्रीमती शकुंतला भरमु शिरोटे वि. श्री. गुलाब मौलाबक्ष डांगे (शेख) वगैरे )**

१. वादीच्या वारसांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ अन्वये वादीचे वारस अभिलेखावर घेऊन दावेचे टायटलमध्ये वादी यांच्या नावासमोर मयत असा शेरा मारुन वारसांना दावेत सामील करुन घेणेकामी केला आहे. प्रतिवादींतर्फे सदर अर्जास नि. ३८ चे पाठीमागे म्हणणे दाखल केले आहे.

२. वादीच्या वारसांच्या कथनानुसार प्रस्तुत दावेमधील वादी या आजारी पडल्याने दिनांक १६.०६.२०२१ रोजी मिरज येथे मयत झाल्या आहेत. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींचेविरुध्द कब्जाकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादीचे कथनानुसार वादीचा अर्ज खोटा, चुकीचा व बेकायदेशीर असून वादीने अर्जात कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही व त्याचा अर्जही मुदतीत नाही. तसेच वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नसल्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा दावा वादीने कब्जाकरिता असल्याने वादीच्या पश्चात दाव्याचे कारण तिच्या वारसांच्या वतीनेही जिवंत राहत असल्याने वाद विषय संपुष्टात येत नाही. वादी ही दिनांक १६.०६.२०२१ रोजी मयत झाली असून त्याबाबतचे मृत्यू प्रमाणपत्र नि.४१/१ कडे दाखल केले आहे. त्यानंतर वादी यांनी सदरचा अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे बेकायदेशीरपणाचे कोणतेही कृत्य वादीच्या अर्जात सदयस्थितीत दिसून येत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, रुल ३ प्रमाणे मयत वादीच्या वारसांना दावेकामी वादीच्या ठिकाणी हजर राहून काम पुढे चालविणेचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे वादीचा

अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचे वारसांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीच्या वारसांनी स्वतःला दावेच्या सरनामेत मूळ वादी शकुंतला शिरोटे हिचे नावासमोर "मयत" असा शेरा मारुन त्याखाली तिचे वारस म्हणून स्वतःची नावे नमूद करुन दावा दुरुस्त करणेबाबतची परवानगी वादीच्या वारसांना देण्यात येते.

३. वादीच्या वारसांनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2022.01.11 10:44:52 +0530

मिरज. (श्रीमती यु.पी. कोळी )

दिनांकः ०७.०१.२०२२ ३रे सह–दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. A.C. Patil (Grade-III) |
| Court | : | III$^{rd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 07/01/2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 11/01/2022 |